# लहान मुलांसदर्भात घडणारे गुन्हे टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

1. आपल्या मुलांकडे वैयक्तिक व जातीने लक्ष दया.
2. घरातील लहान मुलांना नोकरांच्या ताब्यात देवून त्यांची पुर्ण जबाबदारी नोकरांवर सोडून देवू नका.
3. घरातील नोकरांची चारिञ्य पडताळणी करुन त्याची इत्यंभुत माहिती ठेवा.
4. मुलांसमोर घरातील आर्थिक परिस्थितीबाबत भाष्य करु नका, जेणेकरुन ते याबाबत बाहेर चर्चा करणार नाहीत.
5. घरातील आर्थिक बाबींची माहिती नोकरांसमोर उघड करु नका. जेणेकरुन, आपली आर्थिक परिस्थिती नोकरांच्या लक्षात येवून अपहरणासारखे गुन्हे घडणार नाहीत.
6. मुलांशी दररोज संवाद साधुन त्यांच्या अडी–अडचणी समजून घ्या. त्यांना एखादया गोष्टीचा त्रास होत असेल तर ती बाब लपवून न ठेवता संबंधित व्यवस्थापन अगर पोलीसांच्या निदर्शनास आणून द्या.
7. मुले स्कुल बसने शाळेत जात असतील, तर त्या बसमध्ये मुलांच्या देखभालीसाठी महिला नेमलेली आहे, याची खात्री करा.
8. अनोळखी इसमाकडून कोणतीही भेट वस्तू, चॉकलेट्स, खेळणी इत्यादी न घेण्याबाबत मुलांना सक्त सुचना दया.
9. मुलांना शाळेतून आणण्यासाठी आई–वडीलांनी पाठविले अथवा आई–वडीलांचा अपघात झाला असुन ते रूग्णालयात उपचार घेत आहेत, अशा प्रकारची बतावणी करून अनोळखी इसम, एखादा नातेवाईक अगर ओळखीचा इसम हा मुलांचा ताबा घेवु शकतो. अशा प्रसंगी त्यांच्यासोबत न जाता मुलांनी शाळेच्या व्यवस्थापनाशीच संपर्क साधावा अशा सक्त सुचना मुलांना दया.
10. कोणत्याही बेवारस वस्तूंना हात न लावण्याबाबत तसेच कोणत्याही अमिषाला बळी न पडण्याबाबत मुलांना सक्त सुचना दया.